# शेतकरी संघटक

वर्ष १२ वे
अंक १० वा
६ ऑक्टोबर १९९५
पाक्षिक
वार्षिक वर्गणी रु. ३०
किंमत १ रुपया २५ पैसे


# कापूस एकाधिकाराचा मृत्युलेख

**– शरद जोशी**

महाराष्ट्र शासनाच्या कापूस एकाधिकार खरेदीचा अखेरीस अंत झाला. केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालयाचे सचिव श्री. सुब्रमण्यम् यांनी तशी अधिकृत घोषणा आता केली आहे.

एकाधिकार योजनेचे एक जनक यशवंतराव मोहिते यांनीच एकाधिकाराच्या संकल्पनेचे रहस्य अजाणता प्रामाणिकपणे सांगून टाकले होते. "त्या काळात इंदिरा गांधींची राजवट होती, समाजवादाचा बोलबाला होता म्हणून एकाधिकाराची स्थापना झाली."

महाराष्ट्र राज्याने पहिले पाऊल उचलले आहे, पाठोपाठ इतर राज्येही आपापल्या प्रदेशात कापूस एकाधिकार खरेदी योजना सुरू करतील अशी अपेक्षा होती. महाराष्ट्राखेरीज इतर कोणत्याही राज्याने तसा प्रयत्नसुद्धा केला नाही. गुजरात राज्यात कापूस खरेदीत सहकारी चळवळीचे प्रभुत्व आहे, त्यामुळे गुजरातेत तशी गरज भासली नाही. हरियाणा, पंजाब आणि आंध्रप्रदेश या तीन, कापसाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन करणाऱ्या राज्यांत कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया(CCI)ची खरेदी खाजगी व्यापाऱ्यांच्या बरोबर बऱ्यापैकी कार्यक्षमतेने काम करत असल्याने एकाधिकाराचा समाजवादी उत्साह त्यांनी कधी दाखवला नाही. महाराष्ट्रात जन्मलेली एकाधिकार योजना महाराष्ट्रापुरतीच मर्यादित राहिली. या भौगोलिक मर्यादितच एकाधिकार योजनेच्या अपयशाचे एक कारण आहे.

शेतकऱ्यांकडून भांडवल मिळवून कापसापासून ते कापडापर्यंत विविध उद्योगांची एक उतरंड तयार करावी अशी ही योजनेच्या जनकांची कल्पना होती. त्यामुळे कापसाच्या प्रदेशात साखर साम्राज्याच्या तोडीस तोड अशी व्यवस्था तयार होईल अशीही एक आशा. दुर्दैवाने, कापूस एकाधिकार योजना कापूस खरेदीपुरतीच मर्यादित राहिली. शेतकऱ्यांकडून जमा केलेले भांडवल उधळमाधळीत संपून गेले. एकाधिकाराच्या अपयशाचे हे दुसरे कारण.

कास्तकारांनी पिकवलेल्या पांढऱ्या सोन्याला योग्य भाव मिळावा ही एकाधिकाराची महत्त्वाची प्रेरणा. पुलोद सरकारच्या कारकीर्दीत अखिल भारतीय आधारभूत किंमतीपेक्षा निदान २०% अधिक रक्कम हमी किंमत म्हणून मिळावी या तत्त्वालाही मान्यता मिळाली. पण, प्रत्यक्षात दोन चार वर्षांचा अपवाद सोडला तर एकाधिकाराखाली मिळालेली किंमत ही अगदी शेजारच्या राज्यांत खुल्या बाजारात मिळालेल्या किंमतीच्या तुलनेने कमी राहिली. राजीव गांधींच्या काळात तर केंद्र शासनाने हमी किंमत आणि आधारभूत किंमत यांच्यात तफावत असताच कामा नये असा कडक नियम महाराष्ट्र शासनावर लादला. त्यामुळे, एकाधिकार खरेदीची कल्पनाच निरर्थक ठरली होती. महाराष्ट्राखेरीज इतर राज्यांतील शेतकरी पाहिजे तेथे कापूस विकू शकतात. CCI, खाजगी व्यापारी यांतून खरेदीदाराची निवड करू शकतात. त्यांना कायदेशीर हक्काने मिळणारी आधारभूत किंमत आणि महाराष्ट्रातील एकाधिकाराचे कुंकू लावलेल्या शेतकऱ्याला मिळणारी किंमत भांडवली कपात तसेच किंमत चढउतार निधी यांचा बोजा सोसूनही सारखीच राहावी हा नियम म्हणजे सरकारी अजागळपणाचाच पुरावा. किंमत चढउतारनिधी या कल्पनेला राजीव गांधींच्या आदेशानंतर काही अर्थच उरला नाही, आणि तरीही शासनाने ही कपात चालूच ठेवली.

महाराष्ट्र शासनाच्या एकाधिकार खरेदीत शेतकऱ्यांना चांगली किंमत मिळण्याची काहीच शक्यताच नव्हती. एकाधिकार खरेदीत राजकीय वशिलेबाजीपोटी भरमसाठ नोकरभरती झाली. कापूस खरेदी हे हंगामी काम पण त्यासाठी सरकारी धबडग्यात वर्षभर पगार खाणारा पूर्णवेळ नोकरवर्ग, कापसातून रूई करण्यासाठी येणारा खर्च अवाढव्य, त्यात होणारी कापसाची घट सर्वात अधिक. एवढेच नव्हे तर, देशातील एकूण उत्पादनाच्या जवळजवळ २०% माल हाती येऊन विक्रीची किंमत मात्र किरकोळ व्यापाऱ्यांना मिळणाऱ्या किंमतीच्या तुलनेने कमीच. अशी ही अजागळ व्यवस्था केवळ सरकारी आधारावर चालली, एकाधिकारातील नोकरदारांच्या हितासाठी ती चालली.

कापसाची निर्यात हे कधीतरी चालून येणारे भाग्य. कापसाचे पीक तयार होण्याची वेळ आली की यंदा कापसाचा तुटवडा आहे असा गहजब गिरणीमालकांमार्फत त्यांचे मुखंड टेक्स्टाईल कमिशनर यांच्यापासून सर्वांनी चालू करायचा, मग जसजसे वर्ष पुढे जाईल तसतसे उत्पादनाचे आकडे वाढत जाणार आणि शेतकऱ्याच्या हाती काहीही माल राहिला नाही तर कधीतरी निर्यातीचा कोटा सरकारच्या मेहरबानीने सुटणार. निर्यात करायची ठरली की

ते शेवटपर्यंत पार पडेल याची काहीच खात्री नाही. कापसाच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत हिंदुस्थानची प्रतिष्ठा शून्य. त्यामुळे हिंदुस्थानातील व्यापाऱ्यांच्या परदेशी भाऊबंदांनी, निर्यात कोटा जाहिर झाल्याबरोबर काही खरेदी केली तर त्यालाच निर्यात म्हणायचे अशी सारी परिस्थिती.

याउलट, गिरणी मालकांनी जरा आरडाओरडा सुरू केला की तातडीने कापसाच्या आयातीचा निर्णय घेऊन तो लगोलग अंमलातही यायचा. शेतीमालाच्या शोषणाचे सरकारी धोरण सर्वच शेती-उत्पादनांना लागू आहे हे खरे. पण कापसाइतके शोषण दुसऱ्या कोणत्याच मालाचे झाले नाही. डंकेल प्रस्तावावर सही करताना हिंदुस्थान सरकारच्या व्यापार मंत्रालयाने कापसावरील उणे सबसिडी सर्वात अधिक म्हणजे – २०५.८२ टक्के असल्याचा कबुलीजबाब दिला आहे. असल्या सरकारी सुलतानशाहीत एकाधिकार योजना प्रामाणिकपणे राबवली गेली असती तरी यशस्वी ठरली नसती. महाराष्ट्र शासनाची गबाळग्रंथी आणि भ्रष्टाचाराने बरबटलेली एकाधिकार योजना यशस्वी होण्याची मुळातच काही शक्यता नव्हती.

निर्यातीचा कोटा जेव्हा जेव्हा जाहिर होईल तेव्हा तेव्हा, खरे म्हटले तर, महाराष्ट्र एकाधिकार खरेदीस अग्रहक्काने निर्यातीचा कोटा मिळायला पाहिजे होता, पण असे कधी घडले नाही. गुजरात, हरियाणा, पंजाब येथील कापूस निर्यातीत पुढे राहिला. त्यामुळे निर्यातीतील वाढीव किंमतीचा फायदा महाराष्ट्रातील कापूस उत्पादक शेतकऱ्यास कधी तरी नवसासायासाने मिळाला.

एकाधिकार खरेदीचे एक मोठे लाभधारक एकाधिकाराचा नोकरवर्ग. पण त्याहीपेक्षा मोठा फायदा उठवला तो गिरणीमालकांनी. एकाधिकाराच्या सरकारी यंत्रणेत बाजारातील चढउताराचा फायदा घेऊन विक्री करणे हे बसणे कठीणच त्याऐवजी लालफीतीला पेलवणारी एक पद्धती ठरवण्यात आली. आठवड्यातून एकदा कोटेशन मागवून विक्री करायची. आठवड्याच्या आठवड्याला कापूस मिळण्याची खात्री मिळाल्यामुळे गिरण्यांना रूईचा साठा करण्याची काहीच आवश्यकता राहिली नाही. कच्च्या मालाच्या साठ्यात अडकून पडणारे सगळे भांडवल मोकळे झाले. आणि बाजारपेठेपेक्षा पडत्याच भावाने खरेदी करण्याची परिपाठी पडून गेली. गिरणी मालक खूष झाले. विक्री समितीच्या श्रेष्ठींच्या दाही बोटांवर हिऱ्यांच्या अंगळ्या चढल्या. या सगळ्याचा बोजा कापूस उत्पादक कास्तकाराच्या माथ्यावर पडला.

कापूस उत्पादकांना मिळणाऱ्या किंमती कमी आहेत हे सरकारदेखील मान्य करीत असे. बरोबरच, मोठ्या धिटाईने कापसाच्या पडेल भावांचे समर्थनही करीत असे. कापसाचे भाव वाढले तर सुताचे भाव वाढतील आणि त्यामुळे गरीब बिचाऱ्या हातमाग कामगारांवर उपासमारीची वेळ येईल असा मोठा कळवळ्याचा देखावा ही मंडळी करत. हातमाग धंद्यातील उत्पादन गिरणीच्या मालाच्या स्पर्धेत उतरले तर ते कधीच किफायतशीर ठरणार नाही. उलट तेथे कलाकुसरीचे काम झाले तर चांगले उत्पादन मिळवता येईल याची जाणीव हातमागाच्या मुखंडांनी कधी दाखवली नाही. आम्ही अजागळपणे न परवडणारा धंदा चालवू आणि त्याचा बोजा शेतकऱ्यांनी उचलला पाहिजे असा त्यांचा अट्टाहास.

एकाधिकाराला कॉंग्रेसजनांचा पाठिंबा राहिला. नोकरदारांच्या संघटनांचा पाठिंबा राहिला. गिरणीमालकांना तर ही योजना फारच प्यारी. शेतकऱ्याच्या हिताचे नाव घ्यावे, समाजवदाचा जयघोष करावा आणि आपल्या तुंबड्या भरून घ्याव्या असा हा कार्यक्रम वर्षानुवर्षे चालला!

शेतकऱ्यांनी एकाधिकाराला विरोध केला. आपला माल इतर राज्यांत मोठ्या प्रमाणावर नेला. सरहद्दीवर वाहतुकीची बंदी होती हे खरे, पण पोलिसांचे हात ओले केले की कापसाचा ट्रक, ट्रॅक्टर, बैलगाडी खुशाल पुढे जाऊ शके. महत्त्वाच्या नाक्यावरील पोलिस अधिकाऱ्याच्या नेमणुकीचा दरच लक्षावधि रुपयांवर गेला. नोकरदार, गिरणीमालक, हातमागवाले यांच्याबरोबर लाचखाऊ पोलिस अधिकाऱ्यांतही ही योजना लोकप्रिय झाली.

राज्यकर्त्या पक्षांचे हे चरण्याचे आवडते कुरण झाले. योजनेमुळे पक्ष कार्यकर्त्यांना शंभरेक कोटी रुपये पाचवण्याची तरतूद झाली. भारतीय जनता पार्टी विरोधात असताना एकाधिकाराच्या विरुद्ध बोले. शासनात आल्यावर त्यांचे साहजिकच मतपरिवर्तन झाले. एकाधिकार योजना शेतकऱ्याच्या हिताची असल्याचा साक्षात्कार त्यांना झाला. केंद्र शासनाने योजना रद्द केल्याचे जाहिर केल्यानंतरही खरेदी चालू ठेवण्याची घोषणा संबंधीत मंत्र्यांनी केली आहे. थोड्याच दिवसांत एकाधिकाराचे नोकरवर्ग आंदोलनास सुरुवात करतील. राज्यात कॉंग्रेस शासन असते तर कदाचित् आणखी एक वर्ष योजनेला जीवनदान मिळाले असते. विरोधी युतीच्या शासनावर अशी मेहरबानी करण्याचे कॉंग्रेसी केंद्र शासनास काहीच प्रयोजन नाही.

खरे पाहिले तर, एकाधिकार खरेदी रद्द झाल्यामुळे सरकारच्या कार्यक्रमात काहीच फरक पडण्याचे कारण नाही. त्यांनी पूर्वीप्रमाणेच खरेदी चालू ठेवावी. व्यापाऱ्यांशी स्पर्धेने वाढती किंमत द्यावी, फक्त मक्तेदारीचा आग्रह धरू नये. शेतकऱ्यांना परवडले तर एकाधिकार रद्द झाल्यानंतरही सरकारी खरेदीकडे येतील; अन्यथा, खाजगी व्यापाऱ्याकडे जातील. कायद्याच्या बडग्याने शेतकऱ्यांची निष्ठा मिळवता येणार नाही, त्यासाठी काही कर्तबगारी दाखवावी लागेल.

एकाधिकाराचा अंत झाल्याने शेतकरी सुटकेचा निःश्वास टाकणार आहे. पण, स्वातंत्र्याबरोबर जबाबदारीही येते याचे विस्मरण होता कामा नये. पीक हाती आले की केव्हाही विक्रीकरीता घेऊन जावे, माल बाजारात कधी न्यावा, कोणत्या बाजारात न्यावा याचा विचार करण्याचे काही कारण नव्हते. आता परिस्थिती बदलणार आहे. घायकुतेपणाने माल बाजारात नेला तर किंमती कोसळतील आणि 'बघा, एकाधिकारच चांगला होता' अशी शेखी मिरवण्याचा मोका जुन्या व्यवस्थेतील हितसंबंधियांना मिळू शकेल. येणारी व्यवस्था खुल्या बाजारपेठेची नाही. व्यवस्था अजून बंदिस्तच आहे. निर्यात दंडबेड्यात अडकलेलीच आहे. आयात करून देशी किंमत पाडण्याचा उद्योग सरकार केव्हाही करू शकते. महाराष्ट्रातील एकाधिकाराची गुलामगिरी संपली एवढेच काय ते पुढचे पाऊल! बाकी साऱ्या लढाया अजून पुढेच आहेत. ●

# कोसळत्या व्यवस्थेतील पडझड

**— शरद जोशी**

प्रख्यात हिंदी व्यंगकार दिवंगत शरद जोशी यांचे 'पोस्ट ऑफिस' हे मोठे गाजलेले प्रहसन आहे. इंग्रजांनी हिंदुस्थानात टपालाची व्यवस्था चालू केली ही मोठी भाग्याची गोष्ट. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर काही काळतरी जनतेला सहजरित्या पत्रे टाकता आली आणि मिळाली. स्वातंत्र्योत्तर काळात 'पोस्ट ऑफिस'ची सुरुवात झाली असती तर काय झाले असते? आम्हाला, पोस्ट ऑफिस चालू करू अशा नुसत्या घोषणाबाजीवरच एखादी निवडणूक सहज जिंकून नेता आली असती. दुसऱ्या टप्प्यात मुंबई, दिल्ली अशा मोठ्या शहरांपुरतीच टपालाची व्यवस्था सुरू करण्यात आली असती पण ती व्यवस्था परदेशी पद्धतीची नाही, खास 'स्वदेशी' असती. म्हणजे, टपालपेटी रस्त्यावर कोठेही अनाथ, बेघर दिसली नसती, टपाल कचेरीच्या मध्यभागी चार बंदुकधारी संत्र्यांच्या पहाऱ्यात उभी राहिली असती; पत्र टाकण्यासाठी लायसेंस-परमिट काढण्याची यातायात करावी लागली असती; त्यासाठी अर्ज, त्यांच्या अनेक प्रती, त्याला जोडायची प्रमाणपत्रे, द्यावी लागणारी चिरीमिरी सगळे काही करून पत्र टाकायची परवानगी मिळाली म्हणजे मोठी बाजी मारल्याचा उत्साह वाटला असता; टपालामार्फत सरकारविरोधी लोक त्यांचा प्रचार करतात असे दिसले की आणिबाणी जाहिर करून मनाला येईल तेव्हा टपालव्यवस्था बंद केली गेली असती.

व्यंगकार शरद जोशींचे स्वातंत्र्योत्तर पोस्ट ऑफिसविषयीचे चित्रण हे असे आहे. स्वातंत्र्योत्तर काळात, इंग्रजांनी चालू केलेल्या व्यवस्थेचाही भरपूर बट्ट्याबोळ करून 'स्वदेशी' पद्धतीचे पोस्ट ऑफिस तयार करण्यात आम्ही मोठे यशस्वी झालो आहोत. टपाल इतक्या तासात सोडा, दिवसात मिळाले पाहिजे असा वाह्यात 'परदेशी' आग्रह संपला. टाकले आहे ना, मग यथावकाश ते पोचण्याची शक्यता नाकारता येणार नाही. पत्राची पत्रिका बरी असली आणि ग्रहमान ठीक असले, अशुभ ग्रहांची शांती केली तर पत्र पोचेलही!

डॉक्टर मनमोहन सिंगांच्या जमान्यात टपालची मक्तेदारी संपली, खाजगी कंपन्यांना सरकारी टपाल हशीलाच्या वीसपंचवीस पट पैसे देऊन महत्त्वाची पत्रे लोक सोपवू लागले. टपाल खात्यानेही महत्त्वाच्या पत्रांकरिता 'स्पीड पोस्ट' काढले आणि इंग्रजी राज्याचा झेंडा मिरवणारी टपालाची पेटी आणि कचरापेटी यांत फारसा फरक राहिला नाही.

टपाल व्यवस्था विस्कळीत असली, पत्रे मिळण्याची शाश्वती नसली तर मोठी गैरसोय होते. व्यापार, उद्योगधंदे मंदावतात, नोकरीसाठी मुलाखतीचे निमंत्रण यायला विलंब झाला की उमेदवारांच्या जिवाची केवढी घालमेल होते? प्रियजनांचे कुशल कळवणारे कार्ड आले नाही तर चिंता व्याकुळ करते. प्रेमीजनांचा पत्रव्यवहार टपाल कचेरीतून व्हायचा म्हणजे, सुखांतिका दोघांच्या म्हातारणीच यायची! या सगळ्या गैरसोयी जीवघेण्या आहेत, पण त्यामुळे प्रत्यक्ष जीव जातो असे फारसे घडत नाही. टपालाच्या दिरंगाईमुळे प्राण गेला अशा बातम्या वाचनात येत नाही. टपाल खात्याचा गबाळपणा प्राणावर बेतत नाही.

इंग्रजांनी सुरू केलेल्या दुसऱ्या एका व्यवस्थेबाबतमात्र असे नाही. आगगाडीतील गोंधळ प्राण घेतो, एवढेच नव्हे तर, तैमूरलंगाला लाजवील अशा कत्तली घडवून आणतो. फिरोजाबादजवळ झालेला अपघात हे त्याचे एक उदाहरण. फिरोजाबादच्या केबीनवाल्याने कालिंदी एक्स्प्रेस जाऊ दिली, त्यापुढील सिग्नलच्या आधी पहाटे तीनच्या अंधारात कालिंदीच्या वाटेत एक म्हैस आली. ती वाटेत रुळात थांबली. केबीनवाला घोरेलाल वर्मा पहाटेच्या सुमारास काय अवस्थेत असेल याची सहज कल्पना कोणालाही करता येईल. त्याच्या डोळ्यावरची, विचारावरची झापड केवळ झोपेचीच असली, त्याला कोणत्या रसायनाचे साहाय्य झाले नसेल तर मोठे आश्चर्यच म्हणायचे. 'कालिंदी एव्हाना गेलीच असणार, ती सिग्नलपलिकडे गेल्याची निशाणी मिळाली नाही म्हणून काय झाले? काहीवेळा होते असे. गाडी निघून जाते, इकडे काही कळत नाही, मग फुकट स्टेशन मास्तरकडून मेमो मिळतो' असा विचारही कदाचित घोरेलालने केला असेल. मागून येणारी पुरुषोत्तम सुपर फास्ट एक्स्प्रेस ११० किलोमीटर वेगाने येणारी. तिचा खोळंबा करावे म्हटले तरी पंचाईत! निर्घोर झोपेतून उठलेल्या घोरेलालने मागच्या तुफान गाडीला मार्ग मोकळा करून दिला आणि अघोर ते घडले. पुरुषोत्तम कालिंदीस भिडला, डबे इकडे तिकडे फेकले गेले, तीस फूट उंचीवरून खाली पडले. काही डबे सरळ उभे राहिले, काही प्रचंड विद्युतदाबाच्या तारांवर पडले. हातपाय डोकी इकडे तिकडे उडाली. कितीएक चेंगरले. कित्येक विजेच्या झटक्याने मेले. मग नंतर नेहमीप्रमाणे सगळे झाले. आसपासच्या रहिवाशांनी, ज्यांना सहज सोडवण्यासारखे होते त्यांना सोडवले. मग, पोलिस आले, त्यांनी प्रेतांच्या अंगावरच्या दागिने, घड्याळे आणि इतस्ततः विखुरलेल्या किंमती वस्तू उचलण्याचा धडाका लावला.

रेल्वे मंत्री जाफर शरीफ इंग्लंड मध्ये सुट्टीवर गेले होते. ते हजर असताना झालेल्या अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारून पदाचा राजीनामा देण्याचा खुळचट लालबहादुरी विचार त्याच्या मनाला कधीही शिवला नव्हता. या अपघाताबद्दल साधे दुःख व्यक्त करण्याचेही त्यांना काहीच प्रयोजन नव्हते. दोनचार दिवसांनी अपघातस्थळातील

रौद्र भीषणता थोडी ठाकठीक झाल्यावर पंतप्रधान अपघातस्थळाचे निरीक्षण करायला गेले. अशा प्रसंगीही लोकांनी काळे झेंडे दाखवून निषेधाच्या घोषणा केल्या. पंतप्रधानांकडे रेल्वे खात्याचा कारभार शरीफ साहेबांच्या सुट्टीच्या अवधीपुरता आलेला. त्यांना अपघाताची कारणे, उपाययोजना असल्या बाबींवर तोंड उघडण्याचे काहीच कारण नव्हते. तोंड बंद ठेवण्याकरिता मशहूर असलेल्या राव साहेबांनी तोंड उघडले आणि दोन मुद्दे मांडले.

पहिला, भारतातील लोहमार्गावर अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक संदेश व्यवस्था बसवली पाहिजे. तंत्रज्ञान कोठून यायचे? आमच्या येथे तर इलेक्ट्रॉनिकचे कोणते साधन बिघडले तर दुरूस्त करणारा भेटत नाही. साध्या यांत्रिकी व्यवस्थेत एखादा घोरेलाल कत्तल घडवू शकेल पण यंत्रणेत बिघाड असला तर स्थानिक मिस्त्री तो नीट करू शकेल. इलेक्ट्रॉनिक व्यवस्था भारतातील लोहमार्गावर बसवली तर गाड्या धावतात त्यापेक्षा अधिक वेळ उभ्या राहण्याचीच शक्यता आणि अपघात होण्याच्या शक्यतांची तर महाद्वारेच खुलून जातील.

पंतप्रधानांनी आणखी एक महाभयानक विधान केले. बिनराखीव डब्यातील गर्दीत बसलेल्या प्रवाशांची शरीरे इतकी छिन्नविछिन्न झाली की त्यांची ओळख पटण्याची काहीसुद्धा शक्यता राहिली नाही. पंतप्रधानांची प्रतिभा पाजळली – 'दुसऱ्या दर्जाच्या बिनराखीव डब्यातील प्रवाशांच्या कलेवरांची ओळख पटवता येईल अशी व्यवस्था केली पाहिजे' इति करवादले पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव. म्हणजे, थोड्याच दिवसात दुसऱ्या वर्गाच्या साध्या प्रवाशांना त्यांच्या पायांत एक, दंडात एक आणि गळ्यात एक अशा नंबराच्या पट्ट्या बांधून प्रवासाला निघावे लागेल. फिरोजाबादच्या भयानक अपघातावर पंतप्रधानांची ही विनोदी फोडणी!

चारपाचशे माणसे मरणे म्हणजे आजकाल किरकोळ गोष्ट झाली आहे. दोन दिवस वर्तमानपत्री ठळक मथळ्याच्या बातम्या झळकल्या आणि नंतर अपघाततल्या दुर्दैवी जीवांच्या आप्तजनांचा अपवाद सोडल्यास सारा देश फिरोजाबादचे कांड विसरून गेला. गेल्या वर्षात भारतीय रेल्वेवर पाचेकशे अपघात झाले, त्यातला हा एक. गाड्या अजून धावत आहेत. वेळापत्रक नावाची गोष्ट राहिलेली नाही. गाड्या आता मिनिटांनी उशीरा धावत नाहीत, पाचसहा तास ही साधारण दिरंगाई. आजची गाडी उद्या येणे हेही काही फार नवलाईचे समजत नाहीत. अशा व्यवस्थेतही प्रवाशाला जेथे जेथे म्हणून शक्य आहे तेथे तेथे लुंगवण्यासाठी रेल्वे कर्मचाऱ्यांच्या फौजाच्या फौजा उभ्या आहेत.

इंग्रजांच्या काळात चाळीस हजार किलोमीटर लोहमार्ग बांधले गेले, त्याच्या निम्म्यानेसुद्धा नवे मार्ग स्वातंत्र्यानंतर बांधले गेले नाहीत. सगळी रेल्वे व्यवस्था सडली आहे, लोहमार्ग जुने झाले आहेत, निकामी झाले आहेत. डबे आणि इंजिने त्यांची आयुष्यमर्यादा संपली तरी धावत आहेत, काही वेळा गाड्यांशिवाय इंजिने धावतात, कधी इंजीनाशिवाय गाड्या; इंजिनच बंद पडले म्हणजे इंजिन आणि गाड्या दोन्ही खोळंबून पडतात.

आयन रँडच्या एका कादंबरीत, समग्र व्यवस्था कोसळू लागली म्हणजे काय होते याचे तपशीलवार वर्णन आहे. आगगाड्या उशीराने धावू लागतात आणि त्यांचे भयानक अपघात चढत्या श्रेणीने होऊ लागतात असे तिचे वर्णन आहे. आपल्याकडे नेमके हेच घडत असावे.

जुने तंत्रज्ञान, जुने रूळ, जुन्या गाड्या, सरकारीकरणामुळे बेशिस्त, भ्रष्टाचार, कर्मचारी वर्ग जबाबदारीची जाणीव नसलेला, जनतेला लुटण्यास बद्धपरिकर झालेला.

फिरोजाबादची वारंवार पुनरावृत्ती टाळायची असेल तर भारतीय रेल्वे सरकारच्या जबड्यातून सोडवणे यापरतां दुसरा मार्ग नाही. लोहमार्ग, त्यांची निगराणी हे बघणारी एक स्वतंत्र खाजगी व्यवस्था पाहिजे. त्या लोहमार्गावर आगगड्या धाववण्याचा अधिकारी योग्य ते भाडे दिल्यास कोणालाही मिळू शकेल. एकेका मार्गावर अधिकाधिक सुखसोयी देऊन ग्राहकाचे मन जिंकू पाहणाऱ्या खाजगी उद्योगांची चढाओढ लागली पाहिजे.

इंग्रजांनी भारताला टपाल व्यवस्था दिली, रेल्वे व्यवस्था दिली. त्या दोघांचेही आम्ही वाटोळे करून दाखवले; दोघांच्याही खाजगीकरणास आता काहीही पर्याय राहिलेला नाही. ●

★ **प्रामाणिकतेत सौंदर्य**

स्वतःच्या व्यक्तिमत्वाशी प्रामाणिक राहण्याइतके सुंदर दुसरे काहीच नसते. विषय पत्रिकेवर एवढा एकच कार्यक्रम असला की विचारात स्पष्टता, सुसंगतपणा येण्यासाठी नाही तरी त्यातील अस्पष्टता आणि विसंगती कमी होण्यासाठी मदत होते.

★ **पशु, स्त्री, शूद्र यांच्या रांगेत संशोधक व उद्योजक**

गुणाकार फक्त शेतीत होतो हे खरे नाही. पशु, स्त्रिया हेही गुणाकाराचे धनी आहेत. या गुणकांवरच शोषण लादले जाते. आणि गीतेत या तिघांनाच स्वर्गाचा अधिकार नाकारला आहे ही गमतीची गोष्ट. प्रचलित आणि आगामी युगात संशोधक आणि उद्योजक हेही गुणाकारातील गुणक होतील. स्वतःचे संरक्षण करण्याची ताकद त्यांनी दाखवली नाही तर पशु, स्त्री, आणि शूद्र यांच्या रांगेत संशोधक आणि उद्योजकही इहलोकी आणि स्वर्गलोकी सर्व अधिकार गमावून बसतील.

३० सप्टेंबर १९९५ **– शरद जोशी**

*(श्री. भास्कर कापसे, परभणी यांना लिहिलेल्या पत्रातून)*

# ३ . चार पाय छान, दोन पाय वाईट

गवतकापणीचे काम मोठे कष्टाचे होते. हत्यारे माणसाच्या वापरासाठी बनवलेली होती. त्यामुळे गैरसोय होई. विशेषतः मागच्या पायावर उभे राहून जे हत्यार चालवावे लागे ते कोणत्याच प्राण्याला चालवता येत नव्हते. पण डुकरे अशा कठीण प्रसंगातूनही मार्ग काढीत. ती स्वतः कोणतीच कामे करीत नसत. पण इतरांना मार्गदर्शन करण्याचे काम ती करीत असत. इतरांपेक्षा त्यांना थोडे जास्त ज्ञान असल्याने त्यांच्याकडे पुढारीपण येणे स्वाभाविक होते.

बॉक्सर आणि क्लोव्हर मात्र कसून परिश्रम करीत. आता त्यांना लगाम नव्हता. पण एखादे डुक्कर 'चॅक् चॅक्' करी आणि 'भाई हो, पुढे व्हा' असा इशारा देत त्यांच्या मागे असे.

प्रत्येक लहान-मोठा प्राणी आपापल्या कुवतीप्रमाणे गवत साठवणीसाठी कष्ट उपशीत होता. रणरणत्या उन्हातही बदके आणि कोंबड्या गवताच्या चिमुकल्या काड्या आपल्या चोचीत धरून गोळा करीत. शेवटी एकदाचे हे काम आटोपले. जोन्सच्या काळात जितक्या दिवसांत काम संपे त्यापेक्षा दोन दिवस आधीच सारे काम उरकले होते. या हंगामात गवतही पूर्वीपेक्षा मोठ्या प्रमाणावर साठवले गेले. गवत वायासुद्धा गेले नाही. कारण बदकांनी व कोंबड्यांनी आपल्या तीक्ष्ण नजरेने काडी न् काडी वेचली होती.

संपूर्ण उन्हाळाभर पशु-कृषि-संस्थेत सारे काम घड्याळाच्या काट्याप्रमाणे चालू होते. सर्व प्राणी स्वातंत्र्यात खूष होते. चाऱ्याचा प्रत्येक घास त्यांना विलक्षण गोड वाटत होता. कारण हे अन्न त्यांचे स्वतःचे होते. एखाद्या कुरकुऱ्या मालकाने त्यांच्यापुढे टाकलेली ती वैरण नव्हती. दुसऱ्याच्या श्रमावर बांडगुळासारख्या जगणाऱ्या माणसांची हकालपट्टी झाल्याने प्रत्येकाला पोटभर अन्न मिळू लागले होते. विश्रांतीचा काळही पूर्वीपेक्षा अधिक होता.

मळणीच्या वेळी कणसे तुडवावी लागत आणि प्राचीन काळी करीत त्याप्रमाणे धान्य आणि फोलकटे फुंकून वेगळी करावी लागत. कारण शेतावर मळणीयंत्रच नव्हते. अशाप्रकारचे बिकट प्रसंग आले तरी डुकरांची हुषारी आणि बॉक्सरची शक्ती यामुळे या कठीण प्रसंगातूनही तोंड निघे.

बॉक्सरच्या शक्तीबद्दल सर्वच प्राण्यांमध्ये आदर होता. जोन्सच्या कारकीर्दीत तो कष्टाळू होताच पण आतासुद्धा त्याच्या अंगात तीन घोड्यांचे बळ एकवटले होते. काही दिवस तर असे उगवत की शेतीच्या कामाचा सारा भार एकट्या बॉक्सरवरच पडे. जिथे जिथे ताकदीचे, मेहनतीचे आणि कष्टाचे काम असे तिथे तिथे बॉक्सरचा पुढाकार असे.

बॉक्सरने एका कोंबड्याला लवकर उठवण्यासाठी सांगून ठेवले होते. त्याप्रमाणे तो कोंबडा पहाटे आरवून बॉक्सरला इतरांपेक्षा अर्धा तास लवकर उठवी. झोपेतून उठल्याबरोबर बॉक्सर कामाला लागे आणि इतर प्राणी कामावर हजर होण्यापूर्वीच काम पुरे करून टाकी. प्रत्येक समस्येला बॉक्सरजवळ एकच उत्तर होते आणि ते म्हणजे 'मी अधिक परिश्रम करीन!' त्याने आपल्या स्वतःच्या जीवनाचे ब्रीदवाक्यच बनविले होते.

प्रत्येकजण आपापल्या कुवतीप्रमाणे काम करीत असे. कोंबड्यांनी आणि बदकांनी सुगीच्या दिवसात इकडे तिकडे पडलेले धान्य वेचून एकत्रित आणून ठेवून तीन मण धान्य वाचविले. कुणीही चोरून खाल्ले नाही की आपल्याला अन्नधान्य अपुरे मिळते म्हणून कुरकुर केली नाही. जुन्या काळी भांडण-तंटे, चावाचावी, द्वेष-मत्सर यांना जिकडे तिकडे ऊत आलेला असे. पण आता या गोष्टींचा कुठे मागमूसही उरला नव्हता.

मॉलीशिवाय इतर कोणीही कामाची टाळाटाळ करीत नसे. मॉली मात्र सर्वांत उशीर उठे आणि 'माझ्या खुरात खडा अडकला आहे' अशा सबबी सांगून कामावरून लौकर पळत असे.

मांजराची वागणूकही थोडी चमत्कारिक होती. कामाच्या ठिकाणी ते चुकूनही सापडत नसे. तासन् तास ते कुठेतरी गायब होई. जेवणाच्या वेळी मात्र अचूक हजर असे. जणू काही घडलेच नाही अशा थाटात वावरे. त्याच्याजवळ मोठ्या नामी सबबी मात्र तयार असत. जवळ बसून ते इतके प्रेमाने घुरघुरु लागे की त्याच्या सद्हेतूबद्दल कुणालाही अविश्वास प्रगट करता येत नसे.

पण वयोवृद्ध बेंजामिन या गाढवावर मात्र क्रांतीचा कसलाच परिणाम झाला नव्हता. जोन्सच्या कारकीर्दीत जसे धीमे धीमे आणि आस्ते आस्ते तो काम करीत असे तसेच तो आत्ताही करी. तो कामाची टाळाटाळही करीत नसे किंवा स्वतःहून जास्त कामही करीत नसे. क्रांती आणि क्रांतीचे परिणाम याविषयी काहीच मतप्रदर्शन तो करीत नसे.

रविवारच्या दिवशी सर्वांना सुटी असे. न्याहरी रोजच्यापेक्षा एक तास उशिरा दिली जाई आणि न्याहरीनंतर न चुकता एक समारंभ साजरा करण्यात येई. प्रथम ध्वजारोहण करण्यात येई.

स्नोबॉलला सामानाच्या खोलीत एक जुना हिरवा टेबलक्लॉथचा तुकडा सापडला होता. त्यावर पांढऱ्या रंगात एक पंजा आणि शिंग काढून त्याने त्याचा ध्वज बनवला होता. दर रविवारी सकाळी बंगल्यासमोरच्या बगीच्यात हा ध्वज स्तंभावर चढविला जाई. या ध्वजासंबंधी स्पष्टीकरण करताना स्नोबॉल म्हणाला, 'हिरवा रंग हा आपल्या देशातील हिरव्यागार शेतीचा निदर्शक आहे.'

## जनावरांचे शिवार

**जॉर्ज ऑरवेल यांच्या Animal Farm चे भाषांतर : श्री. रमेश मुधोळकर (१९८५)**

**पूर्वसूत्र**

**पारितोषिक विजेत्या मेजरने आपल्या आयुष्याच्या अखेरच्या दिवसात मानव कृषि संस्थेतील सर्व प्राण्यांना त्यांच्या शोषणाची जाणीव देऊन त्यांना स्वराज्याचे साकडे घातले. लवकरच 'पशुवादा'च्या तत्त्वज्ञानाने भारलेल्या प्राण्यांना जोन्सला हाकलून देण्याची संधी मिळाली आणि तेथे 'पशु-कृषि-संस्था' नावाने प्राण्यांचे स्वराज्य स्थापन झाले. बुद्धीमान म्हणून डुकरांवर स्वराज्याची धुरा वाहाण्याची जबाबदारी आली. सहा कलमी घटना तयार झाली. आणि सर्वजण गवत कापणीच्या कामास लागले —**

ध्वजारोहणानंतर सगळेजण मोठ्या गुदामात जमत. तिथे त्यांच्या सभेचे कामकाज होई. आगामी आठवड्यात करावयाच्या कामांची तिथे योजना आखण्यात येत असे. वेगवेगळ्या विषयांवरील ठराव, विधेयके मांडली जाऊन, त्यावर चर्चाही होत असे.

ठराव मांडण्याचे काम सदैव डुकरांकडेच असे. बाकीच्या प्राण्यांना मत कसे द्यावे याचेच फक्त ज्ञान होते. स्नोबॉल आणि नेपोलियन हेच चर्चा, विवाद, भाषणे या कामात मोठे सक्रिय आणि तत्पर होते. पण हळूहळू सर्वांच्या लक्षात येऊ लागले की स्नोबॉलने एखादी कल्पना मांडली की नेपोलियन तिला विरोध करणार आणि नेपोलियनने एखादा ठराव केला की स्नोबॉल त्याला विरोध करणार. काही गोष्टींवर एकमत झाले तरी मागाहून त्याच्यावर खडाजंगी होत असे. फळबागेमागचे पटांगण म्हाताऱ्या-कोताऱ्या प्राण्यांना विश्रांतीसाठी राखून ठेवावे असा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. पण प्रत्येक जातीच्या प्राण्याचे निवृत्तीचे वय काय असावे या मुद्द्यावर बराच वादंग माजला.

लगाम, वेसण ठेवण्याची जी जुनी खोली होती, ती डुकरांनी हेडक्वार्टर म्हणून स्वतःसाठी राखून ठेवली होती, त्याठिकाणी संध्याकाळच्या वेळी ते लोहारकाम, सुतारकाम वगैरे कारागिरीची कामे शिकून घेत. या प्रशिक्षणासाठी त्यांनी बंगल्यातली पुस्तके बाहेर आणली होती. स्नोबॉलने आणखी एक काम सुरू केले होते. इतर प्राण्यांच्या संघटना बनवण्याचे काम त्याने सुरू केले. या संघटनांना 'पशु-समिती' असे नाव त्याने दिले. त्याने कोंबड्यासाठी 'अंडी उत्पादन समिती' स्थापन केली. गाईसाठी 'स्वच्छ शेपूट संघटना' उभारली.

जंगली प्राणी बांधवांसाठी एक पुनर्शिक्षण समिती बनवण्यात आली होती. (उंदरांना आणि सशांना नीट वळण लावण्याचे या समितीचे उद्दिष्ट होते.) मेंढरांसाठी 'अधिक शुभ्र लोकर चळवळ' सुरू करण्यात आली. परंतु सर्वसामान्यपणे या योजनांना अपयशयच आले होते. उदाहरणार्थ, जंगली प्राण्यांना वळण लावण्याचा प्रयत्न सुरू होताच कोसळला होता. हे जंगली प्राणी पूर्वीसारखेच वागत आणि त्यांना उदारपणाची वागणूक दिली तर त्याचा फायदा घेऊन स्वैराचार माजवीत असत.

साक्षरता प्रसार वर्गाला मात्र उल्लेखनीय यश लाभले. काही महिन्यांत प्रत्येक प्राण्याचे थोडेबहुत शिक्षण झाले. डुकरांना तर उत्तम प्रकारे लिहितावाचता येत होतेच पण कुत्र्यांनासुद्धा बऱ्यापैकी वाचता येऊ लागले. म्युरिअल या बकरीला कुत्र्यांपेक्षाही थोडेफार चांगले वाचता येत होते. कधी कधी संध्याकाळी उकिरड्यावर पडलेल्या वर्तमानपत्राच्या तुकड्यावरील मजकूर ती इतरांना वाचून दाखवत असे. बेंजामिन कुणाही डुकराइतके सफाईने वाचू शकत असे. परंतु तो काही वाचत नसे. तो म्हणे, 'माझ्या माहितीप्रमाणे वाचण्यालायक काही नाही.' क्लोवरला सर्व मुळाक्षरे येऊ लागली होती. पण अजून शब्द वाचता येत नव्हते. तर बॉक्सर ए बी सी डी पलीकडील एकही अक्षर वाचता येत नव्हते. मॉलीने फक्त स्वतःच्या नावाची अक्षरे लिहिण्याचे शिक्षण घेतले. त्यापेक्षा अधिक काही ती शिकली नाही. झाडाची पाने आणून ती स्वतःचे नाव सुरेख अक्षरांत लिहून काढी. त्याच्यावर फुले ठेवून त्याची सजावट करी. आणि आदराने त्याभोवती फेऱ्या मारीत रहात असे.

परंतु, बाकीच्या सर्व प्राण्यांचे शिक्षण 'ए' अक्षरापलीकडे जाऊ शकले नाही. मेंढ्या, कोंबड्या, बदके हे आणखी मूर्ख प्राणी सहा कलमे अंतःकरणपूर्वक शिकू शकले नाहीत. बऱ्याच विचाराअंती स्नोबॉलने अशी घोषणा केली की सहाही कलमांचे सार एका वाक्यात आणता येईल. ते वाक्य असे, 'चार पाय छान, दोन पाय वाईट.' पशुवादाची सर्व मूलभूत तत्त्वे या वाक्यात ग्रथित करण्यात आली आहेत. हे वाक्य एकदा संपूर्णपणे आत्मसात केले की त्याला मानवी विचारांपासून कसलाही धोका उरणार नव्हता. असे त्याने आत्मविश्वासपूर्वक सांगितले. या घोषणेवर पक्ष्यांनी आक्षेप घेतला. पण स्नोबॉलने आक्षेप खोडून काढला.

तो म्हणाला, 'बंधूंनो, पक्ष्यांना पंख हे इंद्रिय आहे, या इंद्रियाचा उपयोग पुढे पुढे जाण्यासाठीच आहे, नाना प्रकारच्या कारवाया करण्यासाठी नव्हे, म्हणून दोन पंख हेसुद्धा पायच आहेत असे आपण ध्यानी घेतले पाहिजे. आपल्यापासून माणूस वेगळा ओळखण्याची खूण म्हणजे त्याचा हात ही होय. या साधनानेच तो वेगवेगळी कारस्थाने करीत असतो.'

स्नोबॉलने वापरलेले जडजंजाळ शब्द पाखरांना काही समजले नाहीत. परंतु तरीही त्यांनी त्याचा खुलासा मान्य केला. पूर्वी गोदामाच्या भिंतीवर सहा कलमे लिहिण्यात आलीच होती. तिथे आता सहाही कलमांच्या वरच्या बाजूस 'चार पाय छान, दोन पाय वाईट' ही नवी घोषणा पूर्वीपेक्षाही मोठ्या अक्षरांत लिहिण्यात आली. एकदा तोंडपाठ झाल्यावर मेंढरांनातर ही घोषणा फारच आवडू लागली. केव्हाही वेळी अवेळी, रानातही मेंढरे 'चार पाय छान, दोन पाय वाईट' हा घोष बँ बँ करून करीत रहात. एकदा सुरू केले की या घोषणेचा त्यांना कधी कंटाळा येत नसे.

स्नोबॉलच्या या समित्यांच्या भानगडीत नेपोलियन अजिबात लक्ष घालीत नसे. तो म्हणे, 'हे सारे प्राणी आता प्रौढ झालेले आहेत. त्यांच्या शिक्षणापेक्षा लहान पोरांच्या शिक्षणाकडे लक्ष पुरवणे जास्त आवश्यक आहे.'

गवत कापणी हंगामात जेसी कुत्रीने नऊ पिल्लांना जन्म दिला. ही पिल्ले थोडी मोठी होताच नेपोलियनने ती स्वतःच्या ताब्यात घेतली. त्यांना सामानाच्या खोलीतील एका उंच माळ्यावर नेऊन ठेवले. त्या ठिकाणी त्यांना अशा एकांतात नेऊन ठेवले की हे बच्चे अस्तित्वात आहेत ही गोष्ट हळूहळू सगळे प्राणी विसरून गेले.

दूध कुठे गायब होते यासंबंधी रहस्यही लौकरच उलगडले. रोज डुकरांच्या खाद्यपदार्थात ते मिसळले जात होते. सफरचंदे पिकू लागली होती. एखाद्या दिवशी या सफरचंदांचे समान वाटप करण्यात येईल असे सर्व प्राण्यांना वाटत होते. पण एके दिवशी असा हुकूम सुटला की पडलेली सगळी सफरचंदे फक्त डुकरांसाठीच आहेत. या

प्रकाराबद्दल काही प्राण्यांनी तक्रार केली. तेव्हा यासंबंधी खुलासा करण्यासाठी स्क्वीलरची नेमणूक झाली.

'बंधूंनो!' अशा शब्दात स्क्वीलरने सुरुवात केली. 'आम्ही डुकरे हा प्रकार स्वार्थाने प्रेरित होऊन करीत आहोत किंवा आम्ही विशेष हक्क उपभोगीत आहोत असे तुम्हाला वाटत असेल. पण खरे सांगायचे तर आमच्यातल्या बहुतेकांना दूध आणि सफरचंदे आवडत नाहीत. परंतु आम्ही या वस्तू आमचे आरोग्य टिकविण्यासाठी घेत आहोत. एखाद्या डुकराची प्रकृती चांगली राहण्यासाठी जे घटक आवश्यक आहेत, त्यात दूध आणि सफरचंद हे पदार्थ अत्यावश्यक आहेत. बंधूंनो, ही गोष्ट शास्त्रीय ज्ञानाच्या आधारावर सिद्ध झाली आहे. आम्ही डुकरे डोक्याने काम करणारी असल्याने आमच्या मेंदूवर ताण पडतो. या साऱ्या शेतवाडीच्या व्यवस्थापन कार्याचा आणि संघटन कार्याचा भार आमच्या शिरावर पडलेला आहे. हे काम साधेसुधे नाही. रात्रंदिवस आम्हाला तुमच्याच कल्याणाची चिंता लागून राहिली आहे. केवळ तुमच्या भल्यासाठीच आम्हाला दूध प्यावे लागते आणि सफरचंदे खावी लागतात. आम्हा डुकरांच्या कर्तव्यात जर काही बाधा उत्पन्न झाली तर त्याचे काय विपरित परिणाम होतील याची तुम्हाला कल्पना आहे का? अहो, असे झाले तर जोन्स परत येईल, आणि तुमच्या मानगुटीवर नक्कीच बसेल. जोन्सची राजवट पुन्हा यावी असे तुमच्यापैकी कोणालाच वाटत नसेल, याबद्दल माझी खात्री आहे.'

आता परिस्थिती अशी होती की, जोन्सची राजवट पुन्हा येऊ नये याबद्दल सर्व प्राण्यांचे एकमत होते. सर्व घटनांवर या दृष्टिकोनातून जेव्हा प्रकाश टाकण्यात आला तेव्हा पुढे बोलण्यासारखे काहीच उरले नव्हते.

डुकरांचे आरोग्य टिकवणे ही केवढी महत्त्वाची बाब आहे याबद्दल सर्वांची खात्री झाली.

तेव्हा पुढे काही वादविवाद वा युक्तिवाद न करता सर्वांनी हे कबूल केले की खाली पडलेली (आणि झाडावर पिकलेलीसुद्धा) सर्व सफरचंदे केवळ डुकरांसाठीच राखून ठेवण्यात यावीत. ●

# तत्वनिष्ठा हाच पक्षाचा पाया

**डॉ. रमेश सिंघम**

**स. न. वि. वि.**

आपले पत्र मिळाले. धन्यवाद.

नेहरूप्रणित नियोजनाची व्यवस्था कोसळल्यानंतर अधिक परिणामकारक अर्थव्यवस्था उभी राहण्याऐवजी, उलट जातीयवादाने आणि भीकवादाने उचल खावी हे मोठे आश्चर्य. पण गेल्या निवडणुकीच्यावेळी ही परिस्थिती होती. प्रकाशापेक्षा जास्त वेगाने जाण्याचे तंत्रज्ञान मिळवण्यासाठी एकीकडे प्रयत्न चालू आहेत, तर आपल्याकडे गणपतीपरिवार दूध पिऊ लागला आहे. या परिस्थितीत एक सैद्धांतिक विकल्प लोकांपुढे ठेवणे यापलिकडे आपण काही करू शकत होतो असे मला वाटत नाही. धर्मवादाचा आणि भीकवादाचा जोर ओसरला म्हणजे आपला विचार लोकांना उमजू लागेल. तोपर्यंत तत्त्वनिष्ठपणे, तडजोड न करता झेंडा उभा ठेवणे आपले काम आहे.

जाहिरनाम्यात शहर आणि खेडी असा कोठेही भेदभाव नाही. दोन्ही क्षेत्रांतील सरकारी आधाराखेरीज उभे राहू इच्छिणाऱ्या आणि स्पर्धा करण्याची हिंमत असणाऱ्या उद्योजकांचा हा जाहिरनामा आहे. पंडित नेहरू इत्यादिंचा निषेध आपल्या मनाला आनंद देत नाही; माझ्याही मनाला त्यामुळे दुःख होते. त्यांच्या विचारसरणीने आणि व्यवस्थेमुळे स्वातंत्र्याच्या ५० वर्षांत देश मागासला यात काही शंका नाही. गेल्या ५० वर्षात देशात जे जे घडले त्याबद्दल दुख व्यक्त करायचे आणि ज्यांच्या अध्यक्षतेखाली ते घडले त्यांचा जयजयकार करायचा हे 'स्वतंत्र भारत' पक्षाच्या प्रकृतीस जमणारे नाही.

नोकरशाहीची छाटणी केल्याखेरीज म्हणजे त्याच्यावरील अफाट खर्च आणि जनांना उपद्रव देण्याची त्यांची ताकद कमी केल्याखेरीज देश टिकू शकत नाही, आणि उभा राहू शकत नाही.

नेहरूघराणे सोडल्यास इतर नेते निंदा करण्याच्यासुद्धा पात्रतेचे नाहीत पण त्यांच्या कार्यक्रमावर बोलावे हे फारसे शक्य नाही. काँग्रेस पक्षाचा असा कोणता कार्यक्रम आहे? आणि भाजपाला काय अर्थशास्त्र आहे? या सर्वांचा कार्यक्रम एकच – 'येन केन प्रकारेण' सत्ता संपादन करणे आणि ती हाती आल्यानंतर वाटेल त्या मार्गाने टिकवून धरणे.

कोणत्याही संघटनेतून काही माणसे दुखावली जातात, दुरावली जातात. दुखवण्याच्या गतीपेक्षा अधिक गतीने नवीन माणसे जोडणे हा संघटना वाढवण्याचा सर्वात प्रभावी कार्यक्रम आहे.

नागपूर भागांत आपण पक्षाच्या बांधणीचे जे काम करत आहात त्याची माहिती तुमच्या पत्रातून मिळाली, आनंद वाटला, काम असेच चालू ठेवावे.

३० सप्टेंबर १९९५ आपला,

**शरद जोशी**

## स्वतंत्र भारत पक्ष असा असावा / नसावा

१. जाहिरनामा शहरी व ग्रामिणासाठी सारखाच राहील असा प्रयत्न करावा.

२. दिवंगत नेतेमंडळींचा टीकात्मक नामोल्लेख जाहिरनाम्यात नसावा.

३. नोकरशाहीवर कुठलाही उल्लेख नसावा (सत्ता मिळाल्यानंतर धोरणात्मक कार्यक्रम सुलभरीत्या राबविला जाऊ शकतो.) कर्मचारी वर्ग उगाचच त्याचा बाऊ करून आम जनतेत अपप्रचार करतात.

तसेच, हा पक्ष देश पातळीवर असल्यामुळे सर्वसाधारण लोकांना पचेल असाच सुटसुटीत असावा.

४. कार्यकर्त्यांनी प्रचाराच्या वेळेस दुसऱ्या पक्षाच्या कार्यकर्त्यांवर किंवा नेत्यांवर टीका करण्याऐवजी आपल्या पक्षाच्या कार्यक्रमांवर जास्तीत जास्त भर द्यावा.

५. शेतकरी संघटनेची बरीच मंडळी दुखावली, दुरावली त्या सर्वांना एकत्र कसे आणता येईल यावरही विचार व्हावा.

६. मोक्याची शहरे (महत्त्वाची) यावर थोडा जास्ती भर देऊन आतापासूनच प्रचाराची माध्यमे जोरकस करावी.

२०/९/९५ **डॉ. रमेश सिंघम,** नागपूर.

*(श्री. शरद जोशींना पाठविलेल्या पत्रातून)*

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 6th October, 1995

To

SHETKARI SANGHATAK
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
October 6, 1995

PNCW 281
Licence to post without prepayment
No. 87

# स्त्रियांसाठी राखीव जागा, बोलाचीच कढी?

ग्रामपंचायतीच्या निवडणुकांमध्ये स्त्रियांसाठी राखीव जागा ठेवण्याच्या निर्णयाचे फारसे काही उत्साहाने स्वागत झाले नाही; हा निर्णय नाइलाज म्हणूनच स्वीकारला गेलेला दिसतो. मग उमेदवार निवडीच्या बाबतीत गावातील स्त्रियांना काही वाव न देताच पुरुष मंडळींनीच उमेदवार ठरविण्याचे, जमल्यास बिनविरोध ठरविण्याचे प्रकार बऱ्याच ठिकाणी घडल्याचे आढळून येते.

सदस्यांच्या राखीव जागांपुरतं चालवलं गेलं. पण, जेव्हा सरपंच, उपसरपंच अशी पदंसुद्धा स्त्रियांसाठी राखीव ठेवण्यात आली तेव्हा मात्र मोठीच खळबळ उडाली. पण, सरकारी आदेश, करता काय? कुठे पुढाऱ्याच्याच घरच्या माऊलीला तिथं बसवण्यात आलं आणि कारभार पुढाऱ्याहातीच राहिला. तर कुठं कोणीच स्त्री या पदासाठी इच्छुक नसल्याचा घाट घालण्यात आला; परिणामी, 'सरपंचपदी कोणी स्त्री उमेदवारच नसल्यास उपसरपंचानेच सरपंचाचे काम पाहायचे' या विकल्पाने पुरुषांच्याच हाती कारभार राहिला.

मग जी जागा स्त्रियांसाठी राखीव नाही तिथं कोणी स्त्री मग ती किती का कर्तबगार असेना – बसलेली सहन होणे पुरुषसमाजाला केवळ अशक्यच वाटणार! पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील धोंडमाळ-शिंदेवाडी गावचे प्रकारण याचे एक उदाहरण आहे.

परभणी जिल्ह्यातील टाकळी येथून शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते श्री. लक्ष्मणराव इंगळे यांनी पाठविलेले वृत्त मात्र याही परिस्थितीत प्रकाशकिरण दाखविणारे व शेतकरी संघटनेला अभिमान वाटणारे असे आहे.

●

## बिनराखीव जागी महिला सरपंच

परभणी जिल्ह्याच्या हिंगोली तालुक्यातील टाकळी (T.N.) या ग्रामपंचायतीचे सरपंचपद स्त्रीराखीव न होता बिनराखीव जाहिर झाले. सगळीकडे सरपंचपदासाठी मारामारी होत असता टाकळी (T.N.) गवातील शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी गावाची सभा घेऊन सर्वानुमते महिला सरपंचाची नियुक्ती करून ग्रामपंचायत गठित केली. त्यातील सदस्य पुढीलप्रमाणे : १) सौ. नीलाबाई भ्र. गोविंदराव धनवे (सरपंच) २) श्री. किसनराव संभाजी इंगळे (उपसरपंच) आणि इतर सदस्य जिजाबाई साखरे, रमेश रंगराव जाधव, इंगळे, बेंगाळ, देशमुख.

सर्व सदस्यांनी सरपंच सौ. नीलाबाई धनवे यांच्या नेतृत्वाखाली गावाच्या खऱ्याखुऱ्या विकासाचे कार्यक्रम राबविण्याचे अभिवचन देऊन गावकऱ्यांनी त्यांना पूर्ण सहकार्य करावे असे आवाहन केले.

प्रेषक : **श्री. लक्ष्मणराव इंगळे,**
टाकळी (T.N.)

**चुकीची दुरूस्ती**

मागील अंकातील पहिल्या पानावरील लेखाचे शीर्षक

***'लक्ष्मीकृत' मुखंडींचा बेजिंगी उरूस***

असे वाचावे.

चुकीबद्दल दिलगीर आहे. – संपादक

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता**
**अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)**
**ता. खेड, जि. पुणे.**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
**फोन : द्वारा - चाकण ५२३५४/५२४६८**
**एस्.टी.डी. - ०२१३५**

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक – मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ – गणेश प्रिंटर्स,**
**६९३, बुधवार पेठ, पुणे - २.**